पुणे शहर पोलीस

# दर्पण

डिसेंबर २०१९

# अभिप्राय...

प्रती,

मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक
मुंढवा पोलीस ठाणे ,पुणे शहर.
यांना सविनय सादर

**रिपोर्ट** :- पी.एस.भोसले, पो.ना.४४, मुंढवा पोलीस ठाणे, पुणे शहर
यांजकडुन विनंती पुर्वक की,

**विषय** :- दर्पण पुस्तकाबाबत...

**महोदय,**

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर की, मी मुंढवा पोलीस ठाणे येथे ठाणे अंमलदार म्हणुन कर्तव्य करीत असताना नागरीक आपले विविध तक्रारी घेऊन पोलीस ठाणे येथे येत असतात. ठाणे अंमलदार कक्षात नागरीक बसलेले असताना तेथे ठेवण्यात आलेले दर्पण पुस्तक घेऊन ते त्यामधील पोलीसांनी केलेल्या चांगल्या कामगिरी बाबत वाचुन पोलीसांचे कौतुक व समाधान व्यक्त करीत असतात. पुणे पोलीसांनी केलेल्या चांगल्या कामाची माहिती दर्पण पुस्तकामुळे नागरीकांस मिळते त्याबाबत नागरीकांनी कौतुक व समाधान व्यक्त केल्यामुळे आम्हास चांगले काम करण्याची स्फुर्ती मिळते.

मा.सादर व्हावे.
ता.१८/०६/२०१९

पी.एस.भोसले
पोलीस नाईक ४४
मुंढवा पोलीस ठाणे,पुणे शहर

---

दि-१८/०६/२०१९

[illegible]

विषय-: दर्पण पुस्तिका २०१८ बाबत अभिप्राय...

महोदय,

मा. पोलीस आयुक्त सो. पुणे शहर यांनी

[illegible]

[illegible]

# वाहतुक सुलभता

वाहतुक सुलभता

**लोकमत – दि. ६ डिसेंबर, २०१९**



# आधुनिक स्पीडगनद्वारे वेगावर नियंत्रण

**महामार्गावर वाहनांवर कारवाई : पंधरवड्यात चार लाखांचा दंड**



**प्रभात – दि. १६ डिसेंबर, २०१९**

# चालकांनो! वाहतुकीचे नियम पाळा...



पुणे : विद्यावर्धनी इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थीनी झाशी राणी चौकात वाहनचालकांना वाहतुकीच्या नियमांचे पालन करण्यासाठी जनजागृती केली.

**पुढारी – दि. ०५ डिसेंबर, २०१९**

# रिक्षाचालकांना लावली वाहतूक पोलिसांनी शिस्त

विश्रांतवाडी : वार्ताहर

विश्रांतवाडीतील मुख्य चौकात पोलिस चौकीशेजारी अस्ताव्यस्त थांबणाऱ्या रिक्षाचालकांना वाहतूक पोलिसांनी शिस्त लावली. बॅरिकेड्स लावून रिक्षा ओळीने स्टँडवर लावल्याने चौकातील वाहतूक सुरळीत होण्यास मदत झाली.

विश्रांतवाडी चौक नेहमी वर्दळीने गजबजलेला असतो. त्यातच भाजी विक्रेते, पथारी व्यावसायिक, स्टॉल धारक, अस्ताव्यस्त उभारलेल्या रिक्षामुळे वाहतूक कोंडी होण्यास मदत होत होती. येरवडा-विश्रांतवाडी वाहतूक विभागाचे पोलिस निरीक्षक रमेश साठे यांनी रिक्षा चालकांना अनेक वेळा सूचना देऊन देखील रिक्षा सुरळीत लागत नव्हत्या. त्यावर उपाय म्हणून साठे यांनी पोलिस चौकीच्या शेजारून ते सार्वजनिक स्वच्छता गृहापर्यंत बॅरिकेड्स लावले व रिक्षा ओळीने थांबविल्या. यामुळे चौक मोठा झाला असून वाहतूक सुरळीत होण्यास मदत झाली आहे. दरम्यान, भाजी विक्रेते व पथारी व्यावसायिकांना देखील टेम्पो थांबवून व्यवसाय करण्याच्या सूचना देऊन रस्त्यावर न येण्याच्या सूचना केल्या आहेत. एकंदरीतच विश्रांतवाडी चौक हळूहळू अतिक्रमण मुक्त होण्यास मदत होत आहे.

यावावत रमेश साठे म्हणाले, चौकात रिक्षाच्या दोन ते तीन लाइन लागत होत्या. त्यामुळे टिंगरे नगर व धानोरी हुन येणाऱ्या वाहनांना वळण्यास अडचणी येत होत्या. परिणामी वाहतूक कोंडी होत होती. त्यामुळे बॅरिकेड्स लावले आहेत. पथारी व्यावसायिकांनी देखील वाहतुकीला व पादचाऱ्यांना अडथळा होईल असे बसू नयेत अशा सूचना दिल्या आहेत.



विश्रांतवाडी चौकात बॅरिकेड्स लावून ओळीने थांबविण्यात आलेल्या रिक्षा.

**लोकसत्ता – दि.१७ डिसेंबर, २०१९**

# बेशिस्त वाहनचालकांवर थेट दखलपात्र गुन्हे

## तीन दिवसांत ३४४ वाहनचालकांवर कारवाई

प्रतिनिधी, पुणे

भरधाव वाहन चालविणे तसेच विरुद्ध दिशेने वाहन चालवून गंभीर स्वरुपाच्या अपघातांना निमंत्रण देणाऱ्या दुचाकीस्वार तसेच मोटारचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. बेशिस्त वाहनचालकांवर थेट गुन्हे दाखल करण्यास सुरुवात करण्यात आली असून गेल्या तीन दिवसांत ३४४ वाहनचालकांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्यामध्ये दुचाकीस्वारांचे प्रमाण सर्वाधिक आहे.

> यंदा डिसेंबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत भादंवि २७९ नुसार शहरातील २३०० वाहनचालकांवर दखलपात्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. वाहनचालकांनी वाहतुकीचे नियम पाळावेत, याबाबत पोलिसांनी वेळोवेळी आवाहन केले आहे.
>
> – पंकज देशमुख, पोलीस उपायुक्त, वाहतूक शाखा

वाहतुकीच्या नियमांचा भंग करणे, विरुद्ध दिशेने वाहन चालविणे (नो एंट्री), भरधाव वाहन चालवून गंभीर स्वरुपाच्या अपघातांना निमंत्रण देणे अशा प्रकारच्या नियमभंगामुळे वाहनचालक स्वत:च्या तसेच दुसऱ्याच्या जीवितास धोका निर्माण करतो. बेदरकार वाहनचालकांना चाप लावण्यासाठी पोलीस आयुक्त डॉ के. वेंकटेशम यांनी वाहतूक पोलिसांना कारवाईबाबत सूचना दिल्या आहेत. अशा प्रकारच्या कारवाईमुळे बेशिस्त वाहनचालकांना जरब बसेल, असे वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त पंकज देशमुख यांनी सांगितले. वाहतुकीचे नियम पाळा, पादचारी पट्ट्यांवर (झेब्रा क्रॉसिंग) वाहने उभी करु नका, भरधाव वाहने चालवू नका, असे आवाहन वाहतूक पोलिसांकडून वेळोवेळी करण्यात आले आहे. वाहनचालकांचे प्रबोधन करण्यासाठी पोलिसांनी वेळोवेळी मोहीम राबविली. मात्र, गेल्या काही दिवसांत भरधाव वाहनचालकांच्या बेदरकारपणामुळे गंभीर स्वरुपाचे अपघात घडल्याचे निदर्शनास आल्यानंतर पोलिसांनी भादंवि २७९ नुसार थेट दखलपात्र गुन्हे दाखल करण्यास सुरुवात केली आहे. गेल्या तीन दिवसांत पोलिसांनी ३३४ जणांवर थेट गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, असे देशमुख यांनी नमूद केले.

### गुन्हा दाखल झाल्यानंतर पुढे काय?

भरधाव वाहन चालविणे तसेच विरुद्ध दिशेने वाहन चालविणाऱ्या वाहनचालकांवर भारतीय दंड विधान २७९ नुसार (स्वत:च्या तसेच दुसऱ्याच्या जीवितास धोका निर्माण करणे) गुन्हे दाखल करण्यात येतात. अशा प्रकरणात वाहतूक पोलिसांकडून ज्या भागात नियमभंग झाला असेल त्या पोलीस ठाण्यात फिर्याद देण्यात येते. गुन्हा दाखल करण्यात आल्यानंतर संबंधित वाहनचालकाला अटक करण्यात येते. त्यानंतर न्यायालयाकडून त्याला जामीन मिळवण्याची प्रक्रिया पार पाडावी लागते. भादंवि २७९ कलमानुसार दाखल झालेला गुन्हा दखलपात्र स्वरुपाचा आहे. त्यामुळे भविष्यात पारपत्र, चारित्र्य प्रमाणपत्र मिळविण्यास अडचण निर्माण होते. अनेक खासगी कंपन्यांत नोकरी मिळवण्यासाठी उच्चशिक्षित युवकांना चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र (कॅरेक्टर व्हेरिफिकेशन) सादर करावे लागते.

महाराष्ट्र टाइम्स – दि. २७ डिसेंबर, २०१९

# नागरिकांच्या आर्त हाकेला पोलिसांची साद

## कल्याणीनगर परिसरातील कोंडी सोडवली

म. टा. प्रतिनिधी, पुणे

अनेकदा तक्रारी करूनही वाहतूक कोंडी आणि अतिक्रमणांवर ठोस कारवाई केली जात नसल्याचा अनेकांचा अनुभव आहे. मात्र, कल्याणीनगर परिसरातील नागरिकांनी केलेल्या तक्रारींची दखल घेत, विश्रांतवाडी-येरवडा वाहतूक पोलिसांनी अतिक्रमण हटवून, आणि वाहतुकीला अडथळा करणाऱ्या वाहनांविरोधात विशेष कारवाई मोहीम राबवून हा परिसर कोंडीमुक्त केला आहे.

गेल्या काही वर्षांत झपाट्याने विकसित झालेला आणि 'पॉश' सोसायट्यांचा परिसर अशी ओळख बनलेल्या कल्याणीनगर परिसरात आयटी-कॉर्पोरेट कंपन्या आणि हॉटेलची संख्याही उल्लेखनीय आहे. मोठ्या प्रमाणावरील वाहनांची वर्दळ, मेट्रोचे काम आणि अतिक्रमणांमुळे या परिसरात वाहतूक कोंडीची समस्या भीषण बनत चालली आहे. त्यामुळे ही कोंडी सोडविण्यासाठी येथील स्थानिक नागरिकांनी वाहतूक पोलिसांकडे पाठपुरावा केला होता. येथील बिशप शाळा ते गोल्ड ॲडलॅब थिएटर आणि सायबेज कंपनीपासून गोल्ड ॲडलॅबपर्यंतच्या रस्त्यावर कोंडीची आणि अतिक्रमणांची समस्या भेडसावत होती. विश्रांतवाडी वाहतूक विभागाचे निरीक्षक रमेश साठे यांनी नागरिकांच्या तक्रारींची दखल घेत, कर्मचाऱ्यांना येथील वाहतुकीला अडथळा करणाऱ्या अतिक्रमणांवर कारवाई करण्याची सूचना केली. यात महापालिकेच्या अतिक्रमण विभागाची देखील मदत घेण्यात आली. रस्त्यावर उभ्या केल्या जाणाऱ्या वाहनांवर सातत्याने कारवाई करण्याची सूचना केली. सध्या हा परिसर कोंडीमुक्त बनला असून, नागरिकांना चालण्यासाठी अडथळा विरहीत पदपथ उपलब्ध झाले आहेत.



कल्याणीनगर परिसरातील या रस्त्यावर अनधिकृतपणे होणारे पार्किंग आणि पदपथावरील अतिक्रमणांमुळे पादचाऱ्यांना अडथळ्यांचा सामना करावा लागत होता. वाहतूक पोलिसांच्या कारवाईनंतर पदपथ मोकळे झाले आहेत.

### 'ट्रॅफिक मॅनेजमेंट ॲट केएन'

कल्याणी परिसरातील नागरिक आणि विश्रांतवाडी-येरवडा वाहतूक पोलिस विभागातील अधिकारी यांचा 'ट्रॅफिक मॅनेजमेंट ॲट केएन' या नावाने 'व्हॉट्सॲप ग्रुप' कार्यान्वित आहे. या ग्रुपमध्ये कल्याणीनगर परिसरातील विविध क्षेत्रांत कार्यरत असणारे आणि उच्च शिक्षित रहिवासी आहेत. त्यांच्याकडून सातत्याने परिसरातील वाहतूक समस्या, अतिक्रमणे आणि रस्त्यावरील अस्वच्छतेविषयी तक्रारी, सूचना आणि उपाययोजना 'पोस्ट' केल्या जातात. त्यामुळे वाहतूक पोलिसांना दैनंदिन 'अपडेट' मिळतात.

### पोलिसांचे आभार

कल्याणीनगर कोंडीमुक्त केल्यामुळे वाहतूक पोलिसांचे आभार मानण्यात येत आहेत. मात्र, ही कारवाई तात्पुरती न ठेवता, येत्या काळातही हा परिसर कोंडीमुक्तच राहील, अशी मागणीही नागरिकांनी केली आहे.

### ठळक मुद्दे

- मेट्रोमुळे वाहतुकीसाठी अरुंद रस्ता.
- ट्रॅफिक मॅनेजमेंट ॲट केएन' या 'व्हॉट्सॲप ग्रुप'वर नागरिकांच्या तक्रारी.
- विश्रांतवाडी-येरवडा वाहतूक पोलिस विभागाकडून तातडीच्या कारवाईच्या सूचना.
- वाहतूक पोलिस कर्मचारी, ट्रॅफिक वॉर्डन नेमणूक.

"

नागरिकांकडून तक्रारी प्राप्त झाल्यानंतर कल्याणीनगर परिसरातील कोंडी सोडविण्यासाठी कर्मचारी नेमण्यात आले आहेत. पदपथ अतिक्रमण मुक्त केले असून, रस्त्यावर बेशिस्तपणे उभी राहणार नाहीत, याची खबरदारी घेतली जात आहे. त्यामुळे वाहतुकीला विनाअडथळा रस्ता उपलब्ध होत आहे.

– रमेश साठे, निरीक्षक, विश्रांतवाडी वाहतूक पोलिस विभाग

# सिग्नल रात्रभर सुरू राहणार

## 'ड्रंक अँड ड्राइव्ह'ची कारवाई तीव्र

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'थर्टी फर्स्ट'च्या सेलिब्रेशनवेळी मद्यपान करून बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्यांना अटकाव घालण्यासाठी शहर वाहतूक पोलिसांनी कंबर कसली आहे. गेल्या दोन दिवसांपासून 'ड्रंक अँड ड्राइव्ह'ची कारवाई तीव्र केली असून, ३१ डिसेंबरला मुख्य चौकातील सिग्नल रात्रभर सुरू ठेवण्यात येणार आहेत.

### हे सिग्नल २४ तास सुरू

शहरात ३१ डिसेंबरच्या रात्री वाहनांची वर्दळ गृहीत धरून वाहतूक पोलिसांनी शहरातील २१ महत्त्वाच्या चौकातील सिग्नल २४ तास सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये जुना बाजार, जेधे चौक, विद्यापीठ चौक, नळ स्टॉप चौक, टिळक चौक (डेक्कन), खंडोजी बाबा चौक (डेक्कन), पूरम चौक, बाजीराव रस्ता, मार्केट यार्ड चौक, सिंहगड रोड जंक्शन, राजाराम पूल चौक, ज्ञानेश्वर पादुका चौक, शास्त्रीनगर चौक, सादलबाबा चौक, गोखले चौक आदी प्रमुख चौकांचा समावेश आहे.

सरत्या वर्षाला निरोप व नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी नागरिकांकडून वेगवेगळे बेत आखण्यात येत आहेत. उत्साहाच्या भरात मद्यपान करून अनेकजण वाहने चालवितात. त्यामुळे स्वतःबरोबरच ते इतरांना धोका निर्माण करतात. वर्षभरात वाहतूक पोलिसांकडून अधून-मधून महामार्गावर 'ड्रंक अँड ड्राइव्ह'ची कारवाई केली जाते. नववर्षाच्या आदल्या विशेष मोहीम राबविली जाते. या वर्षीदेखील ही मोहीम राबविली जात आहे. 'वाहतूक पोलिसांनी २९ डिसेंबरला ४८२ मद्यपी वाहनचालकांवर कारवाई केली आहे. त्यानंतर ३० डिसेंबरच्या दिवशी संविधान बचाव मोर्चाच्या बंदोबस्तामुळे ही कारवाई काही प्रमाणात शिथिल करण्यात आली होती. मात्र, ३१ डिसेंबर आणि एक जानेवारीला तीव्र कारवाई केली जाणार आहे,' असे अतिरिक्त पोलिस आयुक्त (वाहतूक) डॉ. संजय शिंदे यांनी दिली.



### अशी होणार कारवाई

- वाहतूक पोलिसांच्या २२ विभागात ब्रेथ ॲनलायझरच्या माध्यमातून वाहनचालकांची होणार तपासणी
- अंतर्गत व प्रमुख रस्त्यांवर स्थानिक पोलिसांची पक्की नाकाबंदी करणार
- दोन दिवसांत ५०० जणांवर 'ड्रंक अँड ड्राइव्ह'ची कारवाई
- 'ड्रंक अँड ड्राइव्ह'मध्ये भरधाव वाहनांवरही होणार कारवाई



### असा असेल वाहतूक बदल

**कॅम्प**

- पुलगेटकडून महात्मा गांधी रस्त्याने १५ ऑगस्ट चौकातून पुढे जाण्यास बंदी
- इस्कॉन मंदिर चौकाकडून अरोरा टॉवरकडे जाणारी वाहतूक बंद
- सरबतवाला चौकाकडून महावीर चौकाकडे जाणारी वाहतूक बंद

**शिवाजी रस्ता**

नववर्षानिमित्त श्रीमंत दगडूशेठ गणपती मंदिरात दर्शनासाठी मोठ्या प्रमाणावर गर्दी होते. त्यामुळे एक जानेवारीला सकाळी पाचपासून गर्दी संपेपर्यंत शिवाजी रस्ता चारचाकी वाहने आणि बससाठी बंद असणार आहे.

# अभिप्राय...

## - दर्पण विशेष अंक संदर्भात अभिप्राय -

दर्पण म्हणजे आरसा. पोलीसांनी केलेल्या चांगल्या व जनहित कारक कामाचे बाबतीत, प्रसिध्दी माध्यमाकडून नेहमीच दुर्लक्ष केले जाते. अपवादात्मक परिस्थीती वगळता पोलीसांचे लोक कल्याणकारी व चांगले कामास कधीच प्रसिध्दी दिली जात नाही. याउलट एखादया नकारात्मक बातमीस प्रभावीपणे प्रसिध्दी दिली जाते. यामुळे पोलीसांचे कार्यपध्दती बाबत जनमाणसांचे मनात नेहमीच नकारात्मक भावना निर्माण होत होती.

परंतु, मा.पोलीस आयुक्त पुणे शहर, यांचे मार्गदर्शनाने, पुणे शहर पोलीसांकडून पोलीसांचे चांगले काम (Good work) बाबतचा दर्पण विशेष अंक प्रसिध्द होत असल्याने पोलीसांचे चांगले कामाची जनतेस आरशाप्रमाणे माहिती उपलब्ध होत असल्याने पोलीसांचे कामकाजाविषयी नागरीकांमध्ये सकारात्मक भावना निर्माण होण्यास व पोलीसांची प्रतिमा उंचावणेस नक्कीच मदत होत आहे.

बी.ए.गायकवाड

पो.हवा.ब.नं.४५९०

येरवडा पोलीस स्टेशन पुणे.

---

दि. २३/०६/२०२३

भारती विद्यापीठ पो.स्टे.

पुणे

नाव:- सुनिल यादवराव देशमाने.

पो.हवा. ४४०५, भा.वि. पो.स्टे. पुणे

विषय-: पुणे शहर पोलीस दलातील दर्पण पुस्तिकेच्या अभिप्राय बाबत.

महोदय,

सन २०१८ या वर्षापासून मा. पोलीस आयुक्त सो. यांनी दर्पण पुस्तकाचा उपक्रम [illegible] करून चालू आहे.

या मासिकामध्ये असणाऱ्या पेपर कटींग व बातम्या या वरून पो.ठाणे येथे येणारे प्रत्येक नागरीक तसेच पो. अधिकारी व कर्मचारी यांना आपल्या ठाण्यातील आपल्या सहकारी अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या चांगल्या कामगिरीबाबत माहिती मिळते तसेच आपण काहीतरी चांगल्या गोष्टी करण्याच्या यावरून प्रोत्साहन मिळते तसेच आपण करीत असलेल्या कामात काहीतरी बदल करावा असे प्रत्येक पो.अधि. व कर्मचारी यांना मार्गदर्शन या पुस्तकाद्वारे मिळत आहे.

मा. सा. होवे

(S. Y. देशमाने)

HC 4405


MPSC aspirant, his friend held for finance co robbery
Bengaluru techie, wo 3 held for MBA grads
Ex-director of IT firm held for data robbery
पोलिसांच्या दक्षतेमुळे मिळाली दागिन्यांची पिशवी
अवैध धंद्यांची यादी पोलीस वेबसाइटवर जाहीर
एस्कॉर्टसाठी तरुणी पुरविणाऱ्यास अटक
दोन सोनसाखळीचोरांना अटक
olice book two for kidnap and murder of 42-year-old woman
'सेल्फी'वरून काढला आरोपींचा माग
तरुणाच्या खुनातील सहा आरोपी अटकेत
Cyber police crackdown on 2K bank accounts in Rajasthan
नववर्षाच्या स्वागतासाठी पोलीसही झाले सज्ज
हजारो अमेरिकन नागरिकांची फसवणूक; कॉल सेंटर
'उत्तम संवाद हा मुलांचे भविष्य घडविण्याचा राजमार्ग'
सराईत गुन्हेगार जाळ्यात
शहर पोलीस करणार चिंतामुक्त ड्यूटी
पोलीस दलाकडे विद्यार्थ्यांना आकर्षित करण्यासाठी शाळांमध्ये कवायत
13,000 offenders booked for drink driving in 2019
खाकी वर्दीला डाग
जीवनाच्या स्पर्धेत यशस्वी
2 detained for questioning in MBA grad murder case
मोबाईल अचानक बंद पडतो तेव्हा!
सायबर गुन्ह्यांबाबत आता विद्यालयांसाठी जागरूकता अभियान
WHAT HAPPENED?